# पनवेल महानगरपालिका

**ता.पनवेल, जिल्हा-रायगड, पनवेल ४१० २०६**

दुरध्वनी कार्यालय : ०२२- २७४५८०४०/४१/४२

ई-मेल :panvelcorporation@gmail.com वेबसाईट:www.panvelcorporation.com


## निवड उमेदवारांकरीता सूचना

पनवेल महानगरपालिका सरळसेवा पदभरती २०२३ अंतर्गत माहे डिसेंबर २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या ऑनलाईन परिक्षेत प्राप्त गुणानुक्रम, प्रवर्गनिहाय, सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेऊन प्रसिद्ध करण्यात आलेल्या निवड सूचीतील निवड यादीत नमूद असलेल्या उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात सादर केलेली माहिती व दस्ताऐवजाची पडताळणी दि.२१/०२/२०२४ व दि.२२/०२/२०२४ रोजी पडताळणी समिती मार्फत करण्यात आली आहे.

दस्ताऐवज पडताळणीअंती पात्र उमेदवारांना निवड पत्र देण्यात आले असून वैद्यकिय तपासणी प्रमाणपत्र व पूर्व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सादर करणेबाबत पत्र देण्यात आले आहे.

**निवडपत्राचे दिनांकापासून ७ दिवसाच्या आत वैद्यकिय तपासणी प्रमाणपत्र व पूर्व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. सदर कालावधी पूर्ण झाले नंतर पुढील ३० दिवस म्हणजे दि.०१/०३/२०२४ ते दि.३०/०३/२०२४ असा सेवेत रुजु होण्यासाठीचा कालावधी देण्यात येत आहे.**

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना दि.२१/०६/२०२१ नुसार महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली २०२१ मधील तरतूदीनुसार उमेदवारांची सेवा ज्येष्ठता निश्चित करण्यात येईल.

**तरी सर्व निवड उमेदवारांना सूचित करण्यात येते की, वैद्यकिय तपासणी प्रमाणपत्र व पूर्व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र त्वरीत या कार्यालयास सादर करावे व सेवेत रुजु होणेबाबतच्या कालावधीची नोंद घ्यावी.**

(मा. आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

**(कैलास गावडे)**
**उप आयुक्त (मुख्यालय)**
**पनवेल महानगरपालिका**